# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.12.2025** **वारःशुक्रवार**

---

1. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन भारत दौऱ्यावर.
2. केंद्रीय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयकाला संसदेची मंजुरी
3. बालविवाहमुक्त भारतासाठी सखोल जागरुकता राष्ट्रीय अभियानाला प्रारंभ
4. भारतीय रिझर्व्ह बँक आज द्वैमासिक पतधोरण जाहीर करणार आणि
5. 'मागेल त्याला सौर कृषीपंप' योजनेत महाराष्ट्राचा विश्वविक्रम

**पुतीन दौरा**

तेविसाव्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचं काल नवी दिल्लीत आगमन झालं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं. दोन दिवसांच्या या दौऱ्यादरम्यान पुतिन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर विचार विनिमय करणार आहेत. या दौऱ्या दरम्यान दोन्ही देशांमध्ये व्यापार, आरोग्यसेवा, तसंच आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि माध्यमांशी संबंधित अनेक करारांवर स्वाक्षरी होण्याची अपेक्षा आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या देखील पुतीन यांची भेट घेणार असून आज त्यांनी पुतीन यांच्या सन्मानार्थ मेजवानीचं आयोजन केलं आहे. तत्पूर्वी काल दोन्ही देशांच्या विविध मंत्र्यांमध्ये नवी दिल्लीत शिष्टमंडळ स्तरावर चर्चा झाली.

दरम्यान पुतीन यांचं स्वागत करण्यासाठी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः जातीने उपस्थित राहिले याची रशियन सरकारने प्रशंसा केली आहे.दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांना रशियन भाषेतील गीतेची प्रत भेट दिली. दरम्यान, भारत दौऱ्यावर निघण्यापूर्वी प्रसार मध्यमांशी संवाद साधताना पुतीन म्हणाले की, भारत-रशिया दरम्यान असलेलं सौहार्द आणि सहकार्य कोणा एका देशाविरुद्ध नसून, उभय राष्ट्रांच्या राष्ट्रीय हितांचं रक्षण करण्यासाठी आहे. भारताने रशियाकडून कच्चं तेल खरेदी करण्यावर अमेरिकेचा असलेला आक्षेप पुतीन यांनी फेटाळून लावला. पंतप्रधान मोदी हे दबावाला सहजपणे बळी पडणारे नाहीत आणि भारतीय लोकांना त्यांच्या नेत्याचा अभिमान वाटला पाहिजे, असं पुतीन म्हणाले.

**संसद**

केंद्रीय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयकाला काल संसदेची मंजुरी मिळाली. यामुळं तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांवर जीएसटी अधिभार रद्द झाल्यावर अतिरीक्त उत्पादन शुल्क लागू करण्याचा मार्ग मोकळा होईल. सिगारेटवर अतिरिक्त शुल्क लागू केल्यानंतर मिळणारा अतिरीक्त महसूल, वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार राज्यांनाही दिला जाईल असं आश्वासन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी राज्यसभेत या विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना दिलं. अधिकाधिक शेतकऱ्यांनी तंबाखू ऐवजी इतर पीकांची लागवड करावी यासाठी सरकारनं विविध योजना आणल्या आहेत. यामुळं महाराष्ट्रासह विविध राज्यातल्या शेतकऱ्यांनी 1 लाख हेक्टरहून अधिक जागेवर इतर पीकं लावायला सुरुवात केल्याचं त्या म्हणाल्या. देशातल्या महामार्गांवर सध्या टोल घेण्यासाठी असलेली व्यवस्था येत्या वर्षभरात बंद करुन, त्याऐवजी विना अडसर इलेक्ट्रॉनिक प्रणाली बसवली जाईल, असं केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नीतीन गडकरी यांनी लोकसभेत सांगितलं. मुंबई-गोवा महामार्गाचं काम 89 टक्के पूर्ण झालं असून, पुढील वर्षी एप्रिल महिन्यापर्यंत ते पूर्ण होईल अशी ग्वाही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काल लोकसभेत दिली.

**एक राष्ट्र-एक निवडणूक-बैठक**

'एक राष्ट्र-एक निवडणूक' या विषयावरील संयुक्त संसदीय समितीची काल नवी दिल्लीत बैठक झाली. भाजपा खासदार पी. पी. चौधरी बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या बैठकीला सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आणि भारतीय 23 व्या कायदा आयोगाचे

अध्यक्ष दिनेश माहेश्वरी उपस्थित होते. एक राष्ट्र एक निवडणूक ही संकल्पना देशाच्या हिताची असून, सर्व बाबींचा विचार करून समिति सरकारला आपल्या शिफारशी सादर करेल असं चौधरी यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना सांगितलं.

**बालविवाह मुक्त भारत**

बालविवाहमुक्त भारतासाठी शंभर दिवसांच्या 'सखोल जागरुकता राष्ट्रीय अभियानाला' कालपासून प्रारंभ झाला. केंद्रीय महिला आणि बालकल्याणमंत्री अन्नपूर्णादेवी यांनी नवी दिल्लीत या अभियानाच्या पहिल्या वर्धापनदिनी, या मोहिमेचं उद्घाटन केलं. पुढील पाच वर्षांत देश बालविवाहमुक्त करण्याचं उद्दीष्ट सरकारने निर्धारित केलं आहे असं त्यांनी सांगितलं. वर्षभर चालणाऱ्या या अभियानांतर्गत देशभरातल्या शैक्षणिक संस्था तसंच पंचायतींमध्ये प्रबोधनपर विविध कार्यक्रम राबवले जाणार आहेत.

**आरबीआय**

भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा आज बँकेचं द्वैमासिक पतधोरण जाहीर करणार आहेत. आरबीआयच्या पतधोरण समितीची, बैठक बुधवारपासून मुंबईत सुरू आहे. या पतधोरण आढाव्यात व्याजदरात 25 टक्क्यांनी कपात होण्याची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे.

**सौर कृषीपंप**

महाराष्ट्रानं 'मागेल त्याला सौर कृषीपंप' योजनेत विश्वविक्रम केला आहे. महावितरणनं एकाच महिन्यात 45 हजार 911 सौर कृषीपंप स्थापित करण्याचा उच्चांक गाठला आहे. या विक्रमाची गिनिज बुकमध्ये यशस्वी नोंद झाली असून गिनीज बुकतर्फे विश्वविक्रम प्रमाणपत्र प्रदान सोहळा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज सकाळी छत्रपती संभाजीनगर इथे होणार आहे. राज्यात साडेदहा लाख सौर कृषीपंप बसविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे.

**अफगाणिस्तान मदत**

एन्फ्लुएन्झा आणि मेंदूज्वर या आजारांच्या प्रतिबंधाला मदत म्हणून भारताच्यावतीनं अफगाणिस्तानला आवश्यक वैद्यकीय सहाय्य पुरवण्यात आलं आहे. त्याचाच एक भाग म्हणून भारतानं एन्फ्लुएन्झा आणि मेंदूज्वरावरील लसीच्या 63 हजार 700 हून अधिक मात्रा काबूलला पाठवल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दिली आहे. ही मदत पाठवून भारतानं अफगाणिस्तानच्या सार्वजनिक आरोग्याप्रती आपली वचनबद्धता पुन्हा एकदा दाखवून दिली असल्याचं जयस्वाल यांनी समाज माध्यमावरील संदेशांत म्हटलं आहे.

**काशी-तमिळ संगमम**

काशी-तमिळ संगममचं पहिलं शिष्टमंडळ आज अयोध्येला भेट देणार आहे. रामजन्मभूमी, हनुमान गढी आणि अन्य धार्मिक स्थळांना हे शिष्टमंडळ भेट देणार आहेत.

**इंडिगो-विस्कळीत**

इंडिगो विमान कंपनीची विमानसेवा सध्या विस्कळीत झाली आहे. काल सुमारे 300 विमान ऩउड्डाणं रद्द करण्यात आली तर अनेक उड्डाणं विलंबानं होत होती. या संदर्भात, नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडे अनेक तक्रारी आल्याच्या पार्श्वभूमीवर नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांच्यासह मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी काल इंडीगोच्या पदाधिकाऱ्यांशी आढावा बैठक घेतली. विमान कंपनीने तातडीने कामकाज सामान्य करण्याचे, तसेच सध्या होत असलेल्या विलंबाच्या परिस्थितीत भाडेवाढ न करण्याचे निर्देश मंत्रालयाने दिले आहेत. तसंच विमान रद्द होणार असल्यास प्रवाशांना तशी संभाव्य आगाऊ सूचना देऊन, आवश्यक असेल तेव्हा त्यांना निवासासह सर्व आवश्यक सुविधा पुरवण्याचे निर्देश दिले आहेत.

**नीती आयोग क्वांटम**

2047 पर्यंत भारताला जगातील पहिल्या तीन क्वांटम अर्थव्यवस्थांमध्ये स्थान मिळवून देण्याच्या उद्देशानं नीती आयोगाच्या आघाडीच्या तंत्रज्ञान केंद्रानं आयबीएम या ख्यातनाम कंपनीशी भागीदारी करून तयार केलेला कृती आराखडा प्रसिद्ध करण्यात आला आहे. जगातील पहिल्या किमान दहा क्वांटम कंपन्यांशी स्पर्धा करू शकेल असं, संगणन हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर विकसित करून जागतिक क्वांटम सॉफ्टवेअर आणि सेवा बाजारपेठेत मोठा हिस्सा मिळवण्याचं लक्ष्य ठेवून या आराखड्याची आखणी करण्यात आली

आहे. संरक्षण, ऊर्जा, आरोग्य सेवा, लॉजिस्टिक्स अशा महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये क्वांटम तंत्रज्ञानाचा वापर करण्याची कल्पनाही आराखड्यात मांडली आहे.

**<u>नौदल दिन</u>**

देशभरात काल नौदल दिन साजरा झाला. मुंबईत नेव्हल डॉकयार्ड इथं नौदल दिनानिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी समाज माध्यमावरील संदेशात भारतीय नौदलाच्या कार्याची प्रशंसा केली आहे. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही नौदल दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

**<u>एनआयए</u>**

संघटित बेकायदा शस्त्रं आणि दारुगोळ्याच्या चोरट्या वाहतूक प्रकरणी राष्ट्रीय तपास संस्था अर्थात एनआयएनं चार जणांना अटक केली आहे. एनआयएच्या 22 पथकांद्वारे बिहार, उत्तरप्रदेश आणि हरियाणा या तीन राज्यांमध्ये विविध ठिकाणांची कसून तपासणी करण्यात आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

**<u>निधन-स्वराज कौशल</u>**

मिझोरामचे माजी राज्यपाल, ज्येष्ठ विधीज्ञ स्वराज कौशल यांचं काल निधन झालं. ते 73 वर्षांचे होते. दिवंगत केंद्रीय मंत्री सुषमा स्वराज यांचे ते पती होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वराज यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**<u>हवामान</u>**

पुढील दोन दिवस झारखंडमध्ये थंडीची लाट येण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. हिमाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपुरा आणि ओडिशा येथे उद्यापर्यंत दाट धुके राहण्याची शक्यता असून, आज तामिळनाडू, पुडुचेरी आणि कराईकलमध्ये मुसळधार पाऊस आणि विजांसह वादळ होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.